आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१२ फेब्रुवारी २०२५ बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- फ्रान्समधल्या ऐतिहासिक मार्सेली शहरात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं जंगी स्वागत

- मुंबईत जीबीएसच्या एका रुग्णाचा मृत्यू, राज्यात आतापर्यंत आठ रुग्णांच्या मृत्यूची नोंद

- देशाच्या प्रत्यक्ष कर संकलनात गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत १४ पूर्णांक ६९ शतांश टक्के वाढ

**आणि**

- ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत मिश्र दुहेरी टेबल टेनिस स्पर्धेमध्ये राज्यातल्या तीन जोड्यांची दमदार  कामगिरी, पदकतालिकेत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर

**<><><><><>**

फ्रान्समधल्या ऐतिहासिक मार्सेली शहरात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आज जंगी स्वागत झालं. त्यांच्या स्वागतासाठी तिथला भारतीय समुदाय मोठ्या संख्येनं उपस्थित होता. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात धारातीर्थी पडलेल्या भारतीय सैनिकांना मजारग्यूज युद्ध स्मशानभूमीत श्रद्धांजली अर्पण केली. तिथल्या पहिल्या भारतीय वाणिज्य दूतावासाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. त्याशिवाय उभय देशांचा संयुक्त प्रकल्प असलेल्या थर्मोन्युक्लिअर एक्सपरिमेंटर रिॲक्टर प्रकल्पाला प्रधानमंत्री भेट देतील. मार्सेली शहराबरोबर भारताचे ऐतिहासिक संबंध असल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे. फ्रान्सचा दौरा आटोपून प्रधानमंत्री बुधवारी दोन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर रवाना होणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचई यांची काल भेट घेतली. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भारतासाठी उपलब्ध होणाऱ्या संधी आणि डिजिटल परिवर्तन याबद्दल आपली चर्चा झाली असं पिचई यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टमधे म्हटलं आहे.

<><><><><>

नवीन प्राप्तीकर विधेयक उद्या लोकसभेत मांडलं जाण्याची शक्यता आहे. गेली ६ दशकं चालत आलेल्या प्राप्तीकर कायद्याची जागा हे विधेयक घेईल. विधेयकात ५३६ कलमं असून २३ प्रकरणं आहेत. कर आकारणीचे वेगळे स्तर, कर आकारणी वर्ष आणि करतपासणी वर्ष या संकल्पनांमधे बदल, इत्यादी कर प्रशासनविषयक बदलांचा या विधेयकात समावेश आहे. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने हे विधेयक तयार करण्यासाठी एक अंतर्गत समिती स्थापन केली होती. या समितीकडे सुमारे साडेसहा हजार सूचना आणि हरकती नोंदवण्यात आल्या होत्या.

<><><><><>

मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर आयुक्तांच्या नियुक्ती विरोधात दाखल याचिकांवर १९ फेब्रुवारी रोजी सुनावणी घ्यायचं सर्वोच्च न्यायालयाने आज निश्चित केलं आहे. सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार १८ फेब्रुवारी रोजी निवृत्त होणार असून त्यानंतर सरकार नव्या मुख्य निवडणूक आयुक्ताची नियुक्ती करू शकतं असं वकील प्रशांत भूषण यांनी न्यायालयाला सांगितलं. त्यावर या प्रकरणाची सुनावणी १९ फेब्रुवारीला केली जाईल, असं न्यायालयाने सांगितलं.

<><><><><>

जीबीएस अर्थात गुईलेन बॅरे सिंड्रोममुळे मुंबईत काल एका रुग्णाचा मृत्यू झाला. या आजारानं मुंबईत झालेला हा पहिलाच मृत्यू आहे. जीबीएसमुळं राज्यात मृत्यू झालेल्यांची संख्या आता ८ झाली आहे.

मुंबईत निधन झालेला हा रुग्ण २३ जानेवारी रोजी नायर रुग्णालयात दाखल झाला होता. त्याच्या १६ दिवसांआधी तो पुण्याला जाऊन आला होता. त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. जीबीएसग्रस्त आणखी एका १६ वर्षांच्या मुलीवरही नायर रुग्णालयात उपचार सुरू असून तिची प्रकृती सुधारत असल्याची माहिती बृह्नमुंबई पालिकेने पत्रकात दिली आहे. दरम्यान, पुण्यात जीबीएस रुग्णांची संख्या १९७ वर पोहोचली आहे.

**<><><><><>**

पुण्यात शिवाजीनगर इथल्या बसस्थानकाची पुनर्बांधणी शहराच्या वाहतुकीसाठी महत्त्वाची आहे. त्यामुळे सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्वावर हे काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करणं गरजेचं असल्याचं मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडलं. याबाबत मंत्रालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. हे काम पूर्ण करण्यासाठी महामेट्रो आणि राज्य परिवहन महामंडळाने समन्वयाने काम करावं अशा सूचनाही पवार यांनी दिल्या.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्याविरोधात समाज माध्यमातून आक्षेपार्ह, अश्लील आणि अपमानास्पद पोस्ट केल्याप्रकरणी दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. "राजकारण महाराष्ट्राचे" या फेसबुक पेजवरून रूपाली चाकणकर यांच्याविरोधात जाणीवपूर्वक

आक्षेपार्ह पोस्ट वारंवार करण्यात येत होत्या. या प्रकरणी राज्य महिला आयोगाकडून पोलिसांकडे तक्रार करण्यात आली होती.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यात सफरचंदाची शेती करण्याचा प्रयोग यशस्वी झाला आहे. उष्ण हवामानातही सफरचंदाचं उत्पादन सिरसोली इथल्या शेतकऱ्यानं दाखवलं आहे. याविषयी अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून....

**व्हॉईस कास्ट – प्रवीण तांडेकर- पीटीसी- भंडारा (२५ सेकंद)**

**<><><><><>**

देशाच्या प्रत्यक्ष कर संकलनात गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत १४ पूर्णांक ६९ शतांश टक्क्यांची वाढ झाल्याची माहिती केंद्रिय प्रत्यक्ष कर मंडळानं दिली आहे. चालू आर्थिक वर्षात १७ लाख ७८ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त प्रत्यक्ष कर संकलित झाला आहे. वैयक्तिक प्राप्तीकर संकलनातही वाढ झाली असून यंदा ९ लाख ४७ हजार कोटी रुपये संकलन झालं आहे. ७ लाख ७८ हजार कोटी रुपये कॉर्पोरेट कर जमा झाला आहे.

**<><><><><>**

राजकीय पक्षांनी निवडणुकीपूर्वी मोफत वस्तू द्यायच्या घोषणा करण्याच्या पद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नापसंती व्यक्त केली. मोफत वस्तूंची सवय लागली तर लोक काम करणार नाहीत,असं न्यायालयाने म्हटलं आहे. नागरी भागात बेघर लोकांच्या निवाऱ्याच्या हक्का संदर्भात न्यायमूर्ती बी आर गवई आणि ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांच्या पीठासमोर सुनावणी सुरू असताना न्यायालयाने ही टिप्पणी केली.  निवारा देण्याचा हेतू चांगला आहे, मात्र त्यांना मुख्य प्रवाहात सामील करून

घेणं जास्त योग्य होणार नाही का, असा प्रश्न न्यायालयाने सरकारला यावेळी विचारला.

<><><><><>

राष्ट्रीय होमिओपथी आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल खुराना यांना पदावरुन हटवण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. खुराना यांच्या नियुक्तीला आव्हान देणाऱ्या याचिकेवर न्यायमूर्ती दीपांकर दत्त आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या पीठाने हा आदेश दिला. डॉ खुराना यांनी एका आठवड्याच्या आत कोणताही धोरणात्मक निर्णय न घेता पदावरुन पायउतार व्हावं असं न्यायालयाने सांगितलं आहे. खुराना यांच्याकडे पदावर नियुक्तीसाठीची अर्हता नसल्याचा दावा याचिकाकर्त्याने केला आहे.

<><><><><>

शीना बोरा हत्या प्रकरणातली आरोपी इंद्राणी मुखर्जी हिला परदेशी जाण्याची परवानगी नाकारण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळून लावली. या प्रकरणाची सुनावणी एका वर्षाच्या आत पूर्ण करायचे निर्देशही न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती राजेश बिंदल यांच्या पीठानं सत्र न्यायालयाला दिले. विशेष न्यायालयानं १९ जुलै रोजी इंद्राणी मुखर्जीला परदेशी जाण्याची परवानगी दिली होती. सीबीआयनं याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आणि न्यायालयानं ही परवानगी रद्द केली. त्याविरोधात इंद्राणी मुखर्जीनं सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

<><><><><>

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत मिश्र दुहेरी टेबल टेनिस स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या तीन जोड्यांनी आपापले सामने जिंकून दमदार कामगिरी केली आहे. काश मोदी आणि तनिषा कोटेचा यांनी पश्चिम बंगालच्या रोनित भंजा आणि सुत्रिता मुखर्जी यांचा ११-३, ११-८ आणि ११-४ असा तीन सेट्स मधे पराभव केला. दुसऱ्या सामन्यात, अल्बुकर्क रेगन आणि स्वस्तिका घोष या जोडीनं पश्चिम बंगालच्या आकाश पाल आणि पोयम्मती बैसिया यांच्या विरुद्ध पाचपैकी दोन सेट्स जिंकले. तर चिन्मय सोमय्या आणि रीत हृष्याने ११-४ आणि ११-७ अशा दोन सेट मधे तामिळनाडूच्या साथियान ज्ञानशेखरन आणि सेलेना दीप्ती सेल्वाकुमार यांना हरवलं.

मल्लखांब स्पर्धेत सांघिक प्रकारात महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिला संघाने रौप्य पदक पटकावलं आहे. पदकतालिकेत ४२ सुर्वणपदकं मिळवून महाराष्ट्र दुसऱ्या क्रमाकांवर आहे.

**<><><><><>**

आशिया मिश्र सांघिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा २०२५ मध्ये, भारताने आज चीनमधल्या किंगदाओ इथं मकाऊवर ५-० असा विजय मिळवला.
भारताच्या सतीश कुमार करुणाकरन आणि आद्य वारियथ या मिश्र दुहेरी जोडीने पहिल्या सामन्यात इओक चोंग लिओंग आणि वेंग ची एनजी या जोडीवर २१-१०, २१-९ असा विजय मिळवला, त्यानंतर पुरुष एकेरीत लक्ष्य सेनने चीनच्या पांग फोंग पुईवर २१-१६, २१-१२ असा विजय मिळवला.

तर महिला एकेरी स्पर्धेत , भारताच्या मालविका बनसोडन हिने हाओ वाई चान वर २१-१५, २१-९ असा विजय मिळवत बरोबरी साधली.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंड दरम्यान मर्यादित षटकांचा एकदिवसीय मालिकेतला तिसरा आणि अंतिम क्रिकेट सामना आज अहमदाबादमधल्या नरेंद्र मोदी मैदानावर होत आहे. तीन सामन्यांच्या या मालिकेत भारतानं 2-0 अशी विजयी आघाडी घेतली आहे. तिसऱ्यास सामन्यात इंग्लंडच्या संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. भारताकडून शुभमन गिल आणि रोहित शर्मा सलामीसाठी उतरले. रोहित शर्मा अवघी एक धाव काढून बाद झाला. त्यानंतर फलंदाजीसाठी उतरलेला विराट कोहली ५२ धावा करून बाद झाला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या २१ षटकात २ बाद १३४ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//